# BHOR CONSTITUTION COMMITTEE.

Bhor State is one of the smaller States in the Deccan with an area of 910 square miles, containing about 500 villages and a population of a little over 1,40,000. Its gross revenue, excluding alienations, is less than six lakhs of rupees, nearly half of which is derived from land revenue collections. In the last census 3.5 per cent. of the population was returned as literate, and the number of scholars at present in school is 2.3 per cent. of the population.

A Legislative Council was first constituted in the State twelve years ago. It was then a wholly nominated body, and though at present it contains six elected members ( the total strength being 21 ), the election is nominal in the case of five of these members since they are elected by taluka local boards which are themselves wholly nominated, and it is indirect in the case of the sixth who is returned by the municipality of Bhor town, which has an elected element ( vide para. 11 of the Report ).

Direct election is now to be introduced for the first time, in virtue of the Ruler's announcement quoted in para. 1, in the selection of 12 out of the Council's total membership of 21. The Council will remain as before an advisory body, with the right conferred on members, however, of moving cut motions in the budget ( see para. 12 ). But five years after the inauguration of the reformed Council, responsibility will be introduced into the nation-building departments of government, and the President of the Council will be elected from among the elected members ( see para. 13 ). The personnel of the Committee is given in para. 2.

## Summary of Recommendations.

## I — Report.

### Extent of the Franchise.

Adult franchise should be declared to be the goal, but its immediate introduction cannot be recommended* ( para. 7 ).

The aim should be to enfranchise between 10 and 15 per cent. of the population ( para. 17 ). The franchise qualifications that have been recommended are intended to produce an electorate of this size; but, reliable data not forthcoming, it is uncertain what the actual size of the electorate will be on the basis of the qualifications recommended. However, in view of the urgent importance of inaugurating the reformed Council at an early date, it is recommended that these

* For a different view see the Minutes of Dissent at the end of this summary.

qualifications should be brought into force at the present time without modification, any resulting deficiencies or anomalies being remedied on the eve of the coming into operation of the wider reforms five years hence, when a revision of the franchise should be undertaken (para. 20).

### Franchise Qualifications.

*Land.*—The main foundation of the franchise is the ownership or tenancy of agricultural land. Those who are in occupation, either as owners or tenants, of land liable to a land revenue assessment of Rs. 8 are entitled to the franchise as a general rule. But, on account of the poor quality of soil and other factors, this standard of Rs. 8 is reduced to Rs. 6 and Rs. 4 in extensive tracts of the State. In the result it is estimated that to 28 per cent. of the population the eight-rupee standard will apply, to 16 per cent. the six-rupee standard and to 56 per cent. the four-rupee standard (para. 28). Holders and tenants of alienated land, assignees of land revenue and khots will be included among the voters. (para. 27).

*House Property.*—In nine specified villages owners of houses worth Rs. 500 and tenants paying an annual rent of Rs. 12 and in the Velwand valley owners and occupants of houses worth Rs. 200 are given the franchise (para. 28).

*Salary.*—Government servants drawing a monthly salary of Rs. 20 and pensioners drawing a monthly pension of Rs. 7 will be enfranchised (para. 32).

*Taxes.*—Those who have paid mohatarfa of Re. 1 (para. 23) and those buffalo-keeping dhangars who have paid dhangar mahal for one buffalo (para. 25) will be admitted to the franchise

*Education.*—No supplementary education test will be imposed on those who will be brought on to the electoral roll in virtue of property qualifications (para. 21). But, as an alternative to the property qualifications, the passing of the vernacular fourth standard examination or the attainment of education of an equivalent standard will be a basis for the franchise (para. 33). So far a little over 2,500 children are known to have passed the fourth standard examination from State schools.

*Lower Qualifications.*—Women will not be disqualified on account of their sex. On the contrary, the educational qualification that will be sufficient for them will be the possession of bare literacy (para. 37). Over 900 girls are receiving instruction at present in State schools. For the untouchables and other backward classes like the dhangars, thakurs and katkaris also the educational qualification will be the same (para. 40). About a hundred untouchable and 25 dhangar children are under primary instruction in State schools at present. The general property qualifications will be halved for the untouchable and backward classes (para. 40). All mahars and ramoshis who are watandars and all the rest of them who, without enjoying watans, bear a liability for village service, will have the suffrage (para. 41).

*Residential Qualification.*—Neither voters nor candidates need be "citizens" of the State (para. 43). No residential qualification is prescribed for those who will be enfranchised on the basis of property tests, but a simple residential qualification is prescribed for those who will be enfranchised on the basis of the education test (para. 45).

## Distribution of Seats.

The twelve elective seats will be allocated as follows. Bhor town will be formed into a separate urban constituency with one seat* (para. 61). This was found to be inevitable (para. 62). The legislative franchise for Bhor will follow in the main the present municipal franchise (para. 64), which admits one-fifth of its population of over 5,000 to the vote. Inamdars and watandars receiving inam income of Rs. 25 will be constituted into a special constituency and given one seat* (para. 70). The remaining ten seats wlll be distributed equally among the five talukas, each taluka being divided into two constituencies for returning one member each (para. 57).

## Qualifications of Candidates.

On candidates no higher property qualifications will be imposed than upon voters (para. 76), but no voter will be eligible to stand as a candidate for election unless he has passed the fourth vernacular standard or is certified to have received education of a corresponding value (para. 78). The Government, however, might allow except-

* For a different view see the Minutes of Dissent at the end of this summary.

ions (para. 79). The requirement of age for voters is that they should have completed 21 years (para. 42) and for candidates that they should have completed 30 years (para. 82). Disqualifications for both voters and candidates will be similar to those laid down in the Government of India Act, 1935 (para. 83), Government being capable of removing the disqualifications. In the case of persons sentenced to two years, Government should pay special attention, in considering the question of the removal of their disqualification for candidature, to the fact whether the offences of which they were convicted were committed in circumstances involving moral turpitude (para. 83). Plural voting will be strictly prohibited in all cases (para. 42). No voter will be permitted to be a candidate in more than one constituency at the same election (para. 42). A voter eligible to stand as a candidate for one constituency will be permitted to stand as a candidate for any other constituency also in the same taluka, but not for a constituency in any other taluka* (para. 46).

## Nominated Unofficial Members.

Without limiting in any way the Ruler's prerogative to select members for filling the nine appointive seats, it is suggested that one of such seats should be given to a member of the untouchable castes, another to a member of the dhangar, thakur, katkari and such other backward classes, a third to one who, though himself drawn from other castes or classes, can effectively voice the needs and aspirations of both the untouchable castes and the backward classes and a fourth to a woman (para. 87). Important interests that do not receive adequate representation in the Council by the process of election should also be given nominated seats, and if the remaining seats are thought to be insufficient for official members, some officials who are not members should be allowed, as occasion demands, to attend the Council for the purpose of giving information and putting forward the official point of view, without the right of voting being conferred upon them (para. 88). The unofficials to be nominated should be informed before they are appointed that they would be free to vote as they liked and that their tenure would extend to the life of the Council.

* For a different view see the Minutes of Dissent at the end of this summary.

## II—Minutes of Dissent.

*Restricted Candidature.*—Four members (Messrs. Vaze, Panse, Sane and Potnis) have recorded in Chapter XV their dissent from the recommendation of the Committee restricting the candidature of a voter to the constituencies in the taluka in which he is enrolled as a voter. They would leave every voter in any territorial constituency (if he is eligible to be a candidate) free to stand as a candidate for that or any other territorial constituency. The restriction, they argue, besides being unfair to the voters, may lead to the election of representatives of inferior calibre and point, in support of their contention, to the experience of British India, Great Britain, the United States, etc.

*Inamdars' Constituency.*—These members think (vide Chapter XVI) that the inamdars do not deserve a seat to be set apart for them either in a general or a special constituency since they cannot be said to be weak either numerically, economically, educationally or politically. They may well be expected to win in open competition a number of seats proportionate to their strength.

*Representation of the Untouchables.*—On the contrary, the members suggest in Chapter XVII that the seat proposed to be given to the inamdars should be reserved for the untouchables and should be filled by election in joint electorates. The untouchables form about one-tenth of the population, but their voting strength in any constituency will be much less than what their numbers warrant, and, what is more, being evenly distributed throughout the State, they will have no chance in a free election contest in any constituency. In the opinion of these members, therefore, one of the twelve elective seats should be earmarked for them. In order that such reservation should become possible, they urge that the proposed grant of a special seat to the inamdars should not be sanctioned; but if it is to be, they recommend that in that case Pawanmawal taluka, in which 87 per cent. of the land is held in inam, should enjoy only one general seat, the other seat which might otherwise have belonged to the taluka going to the inamdars of the whole State (para. 132).

*Adult Franchise.*—One member (Mr. Potnis) is in favour of the immediate introduction of adult franchise (ch. XIII).

*Urban Constituency.*—Two members (Messrs. Potnis and Deo) oppose the grant of a separate constituency for Bhor town (ch. XIII and ch. XIV).

# भोर घटना कमिटी.

भोर संस्थान हें दक्षिण महाराष्ट्रांतील लहान संस्थानांत मोडतें. ह्याचें क्षेत्रफळ ९१० चौरस मैल असून त्यांत ५०० खेडीं आहेत. त्याची लोकसंख्या १,४०,००० पेक्षां थोडी अधिक आहे. इनाम उत्पन्न वगळून संस्थानचें वट्ट उत्पन्न सहा लक्ष रुपयांपेक्षां थोडें कमी आहे. त्यांतील जवळ जवळ अर्धें उत्पन्न जमीनधाऱ्याच्या रूपानें जमा होतें. गेल्या खानेसुमारींत एकंदर लोकसंख्येपैकीं शेंकडा ३.५ लोक साक्षर म्हणून दाखविले होते. आजमितीस लोकसंख्येच्या शेंकडा २.३ इतकीं मुलें शाळांतून शिक्षण घेत आहेत.

भोर संस्थानांत कायदेमंडळाची स्थापना पहिल्याप्रथम झाली ती बारा वर्षांपूर्वीं होय. त्यावेळीं सगळेच सभासद सरकारनियुक्त असत. आजमितीस (कायदेमंडळाच्या एकंदर ३१ सभासदांपैकीं) सहा लोकनियुक्त असले तरी त्यांच्यापैकीं पांचांची निवडणूक नांवालाच होते. कारण ज्यांचे सर्वच्या सर्व सभासद सरकारनियुक्त आहेत अशा तालुका लोकल बोर्डाकडून ही निवडणूक होत असते. सहावा सभासद भोर म्युनिसिपालिटीनें निवडावयाचा असतो. या म्युनिसिपालिटींतले कांहीं सभासद लोकांनीं निवडलेले असतात. यामुळें या सहाव्या सभासदाची निवडणूक अप्रत्यक्ष रीतीनें होते. (रिपोर्टाचा प्यारा ११ पहा.)

प्यारा १ मध्यें उद्धृत केलेल्या राजेसाहेबांच्या घोषणेनुसार, कायदेमंडळाच्या एकंदर २१ सभासदांपैकीं १२ सभासदांची निवड यापुढें प्रत्यक्ष मतदारांनीं करावयाची आहे. अशी निवडणूक होईल तेव्हां प्रत्यक्ष निवडणुकीची पद्धत संस्थानांत प्रथमच सुरू झाल्यासारखें होईल. कायदेमंडळ पूर्वीप्रमाणेंच सल्लागार स्वरूपाचें राहील. सभासदांना अंदाजपत्रकांत कपाती सुचविण्याचा मात्र नवा हक्क मिळेल. (प्यारा १२ पहा.) परंतु सुधारलेलें कायदेमंडळ अस्तित्वांत आल्यापासून पांच वर्षांनीं राष्ट्रसंवर्धक खात्यांसंबंधांत जबाबदारीच्या तत्त्वाची अंमलबजावणी करण्यांत येणार असून कायदेमंडळाचा अध्यक्ष लोकनियुक्त सभासदांमधून निवडण्यांत यावयाचा आहे.

## शिफारशींचा सारांश.

### १.–रिपोर्ट.

### मतदानाची व्याप्ति.

सर्व प्रौढ स्त्रीपुरुषांना मताधिकार देण्याचें ध्येय जाहीर करण्यांत यावें, परंतु त्याची ताबडतोब अंमलबजावणी व्हावी अशी शिफारस करतां येत नाहीं.* (प्यारा ७.)

लोकसंख्येपैकीं शेंकडा १० पासून १५ इतक्या लोकांना मतदानाचा हक्क प्राप्त होईल, अशी योजना असावी. (प्यारा १७.) कमिटीनें मतदानाच्या लायकीसंबंधीं ज्या शिफारशी केल्या आहेत त्यांमुळें वर सांगितल्या इतक्या लोकांना साधारणपणें मताधिकार प्राप्त होईल अशी ढोबळ कल्पना आहे. परंतु याबाबत जरूर ती विश्वसनीय माहिती उपलब्ध न झाल्यामुळें प्रत्यक्ष किती लोक मतदार बनतील हें नक्की सांगतां येत नाहीं. आणि नवीन कायदे-मंडळ सत्वर अस्तित्वांत येणें ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची असल्यानें वरील प्रमाण साधेल असा

---

* या शिफारशीविरुद्ध आपला अभिप्राय भिन्न मतपत्रिकेंत कांहीं सभासदांनीं व्यक्त केला आहे. त्यांच्या अभिप्रायाचें स्वरूप सारांशाच्या दुसऱ्या भागांत दिलें आहे.

प्रयत्न न करतां असें सुचविण्यांत आलें आहे कीं, मतदानाच्या लायकीसंबंधांत ज्या शिफारशी कमिटीनें केल्या आहेत त्यांची अंमलबजावणी त्यांत कांहींहि फेरबदल न करतां करण्यांत यावी. असें करण्यानें जर कांहीं दोष उत्पन्न झाले आहेत अगर कांहीं कमतरता राहून गेली आहे असें पुढें नजरेस आलें तर पांच वर्षांनीं ज्यास्त व्यापक सुधारणांची अंमलबजावणी करण्यापूर्वी हे दोष दूर करावे आणि उणीवा भरून काढाव्या, आणि सध्यांच्या मतदानाच्या एकंदर योजनेचा फेरविचार व्हावा. (प्यारा २०.)

## मतदानाची लायकी.

**जमीनः**—मतदानाचा मुख्य पाया शेतीच्या जमिनीची मालकी अथवा कूळपणा होय. सामान्यतः रु. ८ धाऱ्याची जमीन मालक अगर कूळ या नात्यानें ज्यांच्या हातीं आहे अशा सर्व लोकांना मतदानाचा हक्क देण्यांत आला आहे. परंतु कमी मगदुराची जमीन किंवा असल्याच दुसऱ्या कारणांस्तव ही ८ रु. ची मर्यादा रु. ६ व रु. ४ पर्यंत संस्थानच्या पुष्कळशा भागांत खालीं उतरवण्यांत आली आहे. याचा परिणाम असा होईल कीं, लोकसंख्येच्या शेंकडा २८ लोकांना रु. ८ चें प्रमाण लागू पडेल, शेंकडा १६ लोकांना रु. ६ चें व शेंकडा ५६ लोकांना रु. ४ चें. (प्यारा २८.) इनाम जमिनीचे मालक व त्यांचीं कुळें, इतर इनाम उत्पन्न पावणारे आणि खोत यांचा मतदारांमध्यें समावेश व्हावा. (प्यारा २७.)

**घरें:**—निर्दिष्ट केलेल्या नऊ खेड्यांत रु. ५०० किंमतीच्या घराचे मालक आणि सालिना रु. १२ घरभाडें भरणारे भाडेकरी आणि वेळवंड खोऱ्यांत रु. २०० किंमतीच्या घराचे मालक व घरांत राहणारे इतर लोक यांना मताधिकार दिला आहे. (प्यारा २८.)

**पगारः**—दरमहा रु. २० पगार असणारे सरकारी नोकर व दरमहा रु. ७ इतकें पेन्शन घेणारे सरकारी पेन्शनर यांना कायदेमंडळाच्या निवडणुकींत मतें देतां येतील. (प्यारा ३२.)

**करः**—रु. १ मोहतर्फा (प्यारा २३) ज्यांनीं भरला आहे आणि ज्या म्हसके धनगरांनीं एका म्हशीचा धनगर महाल भरला आहे (प्यारा २५) अशांचीं नांवें मतदारांच्या यादींत घालण्यांत येतील.

**शिक्षणः**—मालमत्तेसंबंधाच्या लायकीमुळें ज्यांचें नांव मतदारांच्या यादींत समाविष्ट होण्यासारखें असेल त्यांना आणखी शिक्षणविषयक पात्रतेची कसोटी लावण्यांत येणार नाहीं. (प्यारा २१.) परंतु मालमत्तेच्या कारणानें ज्यांना मतदानाचा हक्क मिळणार नाहीं अशा लोकांपैकीं ज्यांची मराठी चवथ्या इयत्तेची परीक्षा पास झाली असेल अगर ज्यांचें तितक्या दर्जाचें शिक्षण झालें असेल अशांना मतदानाचा अधिकार प्राप्त होईल. (प्यारा ३३.) संस्थानांतील शाळांत शिक्षण घेऊन आजतागायत २,५०० पेक्षां थोडीं अधिक इतकीं मुलें मराठी चवथ्या इयत्तेची परीक्षा पास झालीं आहेत.

**कमी दर्जाची पात्रताः**—स्त्रियांना त्या स्त्रिया म्हणूनच मतदानाचा हक्क मिळूं नये हें तत्त्व कमिटीनें मान्य केलेलें नाहीं. मतदानाच्या सर्वसाधारण लायकीस त्या पात्र असल्या तर त्यांना मताधिकार मिळेलच, परंतु शिवाय निव्वळ साक्षर असलेल्या सर्व स्त्रियांनाहि मताधिकार प्राप्त होईल. (प्यारा ३७.) संस्थानांतील शाळांमधून आजमितीस ९०० पेक्षां

जास्त मुली शिक्षण घेत आहेत. अस्पृश्य जाती आणि धनगर, ठाकूर व कातकरी यांजसारखे इतर मागसलेले वर्ग यांना स्त्रियांप्रमाणेंच निव्वळ साक्षरतेची कसोटी लावण्यांत येईल. (प्यारा ४०.) अस्पृश्य जातींचीं सुमारें १०० व धनगर जातीचीं २५ मुलें संस्थानांतील शाळांत आजमितीस शिकत आहेत. अस्पृश्य व मागासलेले वर्ग यांच्या संबंधांत मालमत्ता-विषयक लायकी निम्मी करण्यांत येईल. (प्यारा ४०.) सर्व वतनदार महार व रामोशी आणि वतन नसूनहि ज्यांना गांवकीचें काम करावें लागतें असे इतर महार व रामोशी यांना मताधिकार देण्यांत येईल. (प्यारा ४१.)

**वास्तव्यविषयक पात्रता:**–मतदार अगर उमेदवार हे संस्थानचे "प्रजाजन" असले पाहिजेत असा निर्बंध घालण्यांत येणार नाहीं. (प्यारा ४३.) मालमत्ताविषयक लायकीमुळें ज्यांना मतदानाचा हक्क मिळण्याजोगा असेल अशांना वास्तव्यविषयक लायकीची कोणतीच कसोटी लावली जाणार नाहीं, परंतु शिक्षणासंबंधाच्या पात्रतेमुळें ज्यांना मताधिकार प्राप्त होण्यासारखा असेल त्यांच्या संबंधांत मात्र वास्तव्याची साधी व सुटसुटित अशी अट लावण्यांत येईल. (प्यारा ४५.)

## निवडणुकीच्या जागांची विभागणी.

निवडणुकीनें भरावयाच्या बारा जागांची वांटणी पुढें दिल्याप्रमाणें करण्यांत येईल. भोर शहर हा एक वेगळा मतदारसंघ समजून त्याला एक जागा देण्यांत येईल.* भोरचा स्वतंत्र मतदारसंघ करणें अनिवार्य आहे असें आढळून आलें. (प्यारा ६२.) म्युनिसिपालिटीच्या निवडणुकींत ज्यांना मतदानाचा हक्क आहे त्यांना साधारणपणें कायदेमंडळाच्या निवडणुकींत मतदार म्हणून भाग घेतां येईल. (प्यारा ६४.) या कसोटीनें भोर शहरच्या एकंदर ५,००० पेक्षां थोड्या अधिक लोकवस्तीपैकीं पांचवा हिस्सा इतक्या लोकांस मतदानाचा हक्क मिळेल. ज्यांचें इनाम उत्पन्न रु. २५ आहे अशा इनामदारांचा व वतनदारांचा विशेष मतदारसंघ बनवून त्यास एक जागा देण्यांत येईल.* (प्यारा ७०.) बाकी राहिलेल्या दहा जागा संस्थानच्या पांच तालुक्यांमध्यें दोनदोन प्रमाणें सारख्या वांटल्या जातील. प्रत्येक तालुक्याचे दोनदोन भाग करून प्रत्येक भागानें एकेक सभासद निवडून द्यावा असें ठरविण्यांत येईल. (प्यारा ५७.)

## उमेदवारांची लायकी.

मतदारांपेक्षां उमेदवारांना जास्त वरच्या दर्जाची मालमत्ताविषयक योग्यतेची कसोटी लावण्यांत येणार नाहीं. (प्यारा ७६.) मात्र मराठी चवथ्या इयत्तेची परीक्षा पास झाल्याखेरीज अथवा तितक्या मगदुराचें शिक्षण झाल्याबद्दल दाखला हजर केल्याखेरीज कोणत्याहि मतदारास निवडणुकीस उभें राहतां येणार नाहीं असा सर्वसामान्य नियम करण्यांत येईल. (प्यारा ७८.) या नियमास अपवाद करण्याचा सरकारला अधिकार राहील. (प्यारा ७९.)

---

* या शिफारशीविरुद्ध आपला अभिप्राय भिन्न मतपत्रिकेंत कांहीं सभासदांनीं व्यक्त केला आहे. त्यांच्या अभिप्रायाचें स्वरूप सारांशाच्या दुसऱ्या भागांत दिलें आहे.

वयाचीं २१ वर्षें पुरीं झाल्याखेरीज कोणाला मतदार होतां येणार नाहीं (प्यारा ४२), आणि ३० वर्षें पुरीं झाल्याखेरीज उमेदवार होतां येणार नाहीं. (प्यारा ८२.) मतदार व उमेदवार या दोघांनाहि १९३५ च्या ब्रिटिश हिंदुस्थानच्या घटनाकायद्यांत सांगितलेल्या नालायकीच्या अटी लागू होतील. (प्यारा ८३.) उमेदवारीसंबंधांतली नालायकी रद्द करण्याच्या प्रश्नाचा विचार करतांना, दोन वर्षें शिक्षा झालेल्या लोकांचे गुन्हे अनैतिक स्वरूपाचे होते किंवा कसें या गोष्टीकडे सरकारनें विशेष लक्ष पुरवावें. (प्यारा ८३.) मतदाराला निवडणुकींत एकापेक्षां अधिक वेळां मतदान करण्यास केव्हांहि सक्त मनाई करण्यांत येईल. (प्यारा ४२.) एकाच निवडणुकींत कोणत्याहि मतदारास एकापेक्षां अधिक मतदारसंघांत उमेदवार म्हणून उभें राहतां येणार नाहीं. (प्यारा ४२.) एका मतदारसंघांत उमेदवार म्हणून उभें राहण्याची लायकी असलेल्या मतदारास त्याच तालुक्यांतील दुसऱ्या कोणत्याहि मतदारसंघातर्फें उभें राहतां येईल. मात्र त्याला दुसऱ्या तालुक्यांतील कोणत्याहि मतदारसंघातर्फें उभें राहतां येणार नाहीं.* (प्यारा ४६.)

## सरकारनियुक्त बिनसरकारी सभासद.

सरकारी नेमणुकीनें भरावयाच्या नऊ जागांवर कोणाची नेमणूक करावयाची किंवा कोणाची करावयाची नाहीं हें ठरविण्याचा अधिकार अर्थात्च राजेसाहेबांकडे आहे. हा राजेसाहेबांचा अधिकार अबाधित राखून कमिटीनें असें सुचविलें आहे कीं यांपैकीं एक जागा अस्पृश्यवर्गीयास द्यावी, दुसरी मागासलेल्या वर्गांतील एखाद्या इसमास द्यावी, तिसरी स्वतः अस्पृश्य अगर मागासलेल्या जातींपैकीं नसला तरी त्यांच्या गरजा व आकांक्षा परिणामकारक रीतीनें कायदेमंडळापुढें मांडूं शकेल अशा गृहस्थास द्यावी आणि चवथी एखाद्या स्त्रीला द्यावी. (प्यारा ८७.) निवडणुकीच्या मार्गानें कायदेमंडळांत महत्त्वाच्या हितसंबंधांचे पुरेसे प्रतिनिधी आले नसतील तर अशी उणीवहि नेमणुकीनें भरून काढावी. आणि बाकी उरतील त्या जागा सरकारी सभासदांस अपुऱ्या पडतात असें वाटल्यास प्रसंगविशेषीं कांहीं अधिकाऱ्यांना कायदेमंडळांत हजर राहण्यास परवानगी द्यावी. मात्र ते कायदेमंडळाचे सभासद म्हणून हजर राहूं शकणार नाहींत अथवा त्यांना मत देण्याचा हक्कहि असणार नाहीं. त्यांना फक्त माहिती देण्याची व सरकारी बाजू पुढें मांडण्याची मुभा राहील. (प्यारा ८८.) बिनसरकारी सरकारनियुक्त सभासदांना मनास वाटेल त्याप्रमाणें मत देण्याची मोकळीक असल्याबद्दल व त्यांच्या सभासदत्वाची मुदत कायदेमंडळाच्या आयुर्मर्यादेपर्यंत राहील अशाबद्दल नेमणूक करण्यापूर्वीं कळविण्यांत यावें.

## २.–भिन्नमतपत्रिका.

**उमेदवारीवर निर्बंधः**–ज्या तालुक्याच्या मतदारांच्या यादींत एखाद्या उमेदवाराचें नांव असेल त्यांतील मतदारसंघांतर्फेंच त्यानें उभें रहावें असा उमेदवारीवर निर्बंध घालण्याबद्दल कमिटीनें शिफारस केली आहे. या शिफारशीविरुद्ध चार सभासदांनीं (श्री. वझे, श्री. पानसे,

* या शिफारशीविरुद्ध आपला अभिप्राय भिन्न मतपत्रिकेंत कांहीं सभासदांनीं व्यक्त केला आहे. त्यांच्या अभिप्रायाचें स्वरूप सारांशाच्या दुसऱ्या भागांत दिलें आहे.

श्री. साने व श्री. पोतनीस यांनीं) १५ व्या चॅप्टरमध्यें आपला अभिप्राय प्रदर्शित केला आहे. कोणत्याहि प्रादेशिक मतदारसंघांत नांव असलेल्या प्रत्येक मतदारास त्या अगर दुसऱ्या कोणत्याही प्रादेशिक मतदारसंघांत उमेदवार म्हणून उभें राहण्याची ( तो उमेदवार होण्यास पात्र असल्यास) मोकळीक असावी असें त्यांचें म्हणणें आहे. मतदारांच्या दृष्टीनें असलें बंधन गैर असून ह्याच्यामुळें हलक्या प्रतीच्या प्रतिनिधींची निवड होण्याचा संभव आहे असा त्यांचा युक्तिवाद आहे आणि आपल्या म्हणण्याच्या समर्थनार्थ ब्रिटिश हिंदुस्थान, इंग्लंड, अमेरिका वगैरे देशांच्या अनुभवाकडे त्यांनीं अंगुलिनिर्देश केला आहे.

**इनामदारांचा खास मतदारसंघः**—या चार सभासदांचें असेंही मत आहे ( १६ वा चॅप्टर पहा ) कीं सामान्य अगर खास मतदारसंघांत इनामदारवर्गासाठीं एक जागा राखून ठेवण्याची गरज नाहीं. संख्याबल, सांपत्तिक स्थिति, शिक्षण अगर राजकीय प्रगति, यांपैकीं कोणत्याहि दृष्टीनें हा वर्ग दुर्बल आहे असें म्हणतां येणार नाहीं. इतकेंच काय, पण उघड चढाओढींत इनामदारांना आपल्या संख्याबलाच्या मानानें जागा सहज काबीज करतां येतील अशी अपेक्षा करतां येण्यासारखी आहे.

**अस्पृश्यांचें प्रतिनिधित्वः**—उलटपक्षीं, १७ व्या चॅप्टरमध्यें हे चार सभासद असें सुचवितात कीं, इनामदारांना देऊं केलेली जागा अस्पृश्यांसाठीं राखून ठेवावी आणि ती संयुक्त मतदारसंघामार्फत निवडणुकीनें भरावी. भोर संस्थानांत अस्पृश्यांची संख्या एकंदर लोकसंख्येच्या जवळ जवळ दहावा हिस्सा आहे. परंतु कोणत्याहि मतदारसंघांत त्यांची संख्या त्यांच्या एकंदर संख्याबलाच्या मानानें पुष्कळच कमी असणार आणि त्यांतल्या त्यांत विशेष म्हणजे असें कीं, ते संस्थानभर सारख्या प्रमाणांत पसरून गेले असल्यामुळें कोणत्याहि मतदारसंघांत खुल्या निवडणुकींत त्यांना यश मिळण्याचा मुळींच संभव नाहीं. यासाठीं या सभासदांचा असा अभिप्राय आहे कीं, निवडणुकीनें भरावयाच्या बारा जागांपैकीं एक अस्पृश्यवर्गीयाकरितां राखून ठेवावी. असें करतां यावें म्हणून इनामदारांसाठीं राखून ठेवण्यांत यावयाच्या खास जागेच्या योजनेस मंजुरी मिळूं नये असें त्यांचें आग्रहपूर्वक सांगणें आहे; परंतु ती योजना मंजूर होणारच असेल तर या सभासदांची अशी शिफारस आहे कीं, ज्या पत्तनमाळ तालुक्यांतील ८७ टक्के जमीन इनामदारांकडे आहे त्या तालुक्याला फक्त एकच सर्वसाधारण जागा द्यावी, आणि त्या तालुक्याच्या वांट्यास जी दुसरी जागा एरवीं आली असती ती सगळ्या संस्थानांतील इनामदारांना द्यावी. ( प्यारा १३२. )

**प्रौढ मतदानपद्धतिः**—श्री. गोपीनाथराव पोतनीस यांच्या मतें संस्थानांतील सर्व प्रौढ स्त्रीपुरुषांस मतदानाचा हक्क ताबडतोब देण्यांत यावा. ( १३ वा चॅप्टर. )

**भोरचा नागर मतदारसंघः**—श्री. पोतनीस व श्री. देव हे भोर शहरास स्वतंत्र मतदारसंघ देण्याच्या विरुद्ध आहेत. ( १३ वा व १४ वा चॅप्टर. )